सोमवार, दि. १६ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १९५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जवेरहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## संत गजानन हॉस्पीटलमध्ये तरुणाचा संशयास्पद मृत्यू

### अपघात, आत्महत्या की हत्या कारण अस्पष्ट



**जालना । पतिनिधी -** शहरात संत गजानन हॉस्पिटल येथे एका तरुणाचा मृतदेह आढळल्याने जालना शहरात एकच खळबळ उडाली आहे. अमोल राजेंद्र दोडके (वय अंदाजे ३५) असे मृत तरुणाचे नाव असून तो हॉस्पिटलच्या ऑपरेशन थिएटर विभागात काम करत होता.

मिळालेल्या माहितीनुसार, अमोल दोडके हा नेहमीप्रमाणे कामासाठी हॉस्पिटलमध्ये गेला होता. मात्र रात्री उशिरापर्यंत तो घरी परतला नाही आणि त्याचा मोबाईलही बंद लागत असल्याने कुटुंबीय चिंतेत होते. नाईट शिफ्टमुळे उशीर झाला असावा, असा अंदाज कुटुंबीयांनी व्यक्त केला होता.

परंतु सकाळपर्यंत कोणताही संपर्क न झाल्याने कुटुंबीयांनी थेट हॉस्पिटलमध्ये धाव घेतली. तेव्हा अमोलचा मृतदेह हॉस्पिटलच्या परिसरात फरशीवर पडलेल्या अवस्थेत आढळून आला. हा प्रकार उघडकीस येताच परिसरात एकच खळबळ उडाली.

अमोल दोडके याला ऑपरेशन थिएटरमधील कामाचा तब्बल १५ वर्षांचा अनुभव होता. गेल्या महिन्यापासून तो संत गजानन हॉस्पिटल येथे शस्त्रक्रिया विभागात कार्यरत होता.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा सुरू केला. मृतदेह पुढील तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.

याबाबत उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी सांगितले की, ''मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे कारण स्पष्ट होईल. सध्या सीसीटीव्ही फुटेज तसेच हॉस्पिटलमधील पान २ वर

## जालना औषध विक्रेता संघटनेत वाद चिघळला

# साईनाथ पवार घटनाबाह्य अध्यक्ष; सदस्यत्व रद्द करण्याचा अधिकार नाही - प्रमोद तोतला

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हा औषध विक्रेता संघटनेत अंतर्गत वाद चिघळल्याचे समोर आले असून, संघटनेचे अध्यक्ष साईनाथ पवार यांनी प्रमोद तोतला यांचे सदस्यत्व रद्द केल्याची घोषणा केल्यानंतर या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. मात्र हा निर्णय ''अकलेचे तारे तोडणारा'' असल्याची तीव्र प्रतिक्रिया प्रमोद तोतला यांनी देत, साईनाथ पवार हेच घटनाबाह्य अध्यक्ष असल्यामुळे त्यांना असा कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार नसल्याचा आरोप केला आहे.

माध्यमांशी बोलताना प्रमोद तोतला म्हणाले की, संघटनेच्या घटनेनुसार कोणत्याही सभासदावर कारवाई करण्यापूर्वी त्या व्यक्तीस आपली बाजू मांडण्याचा अधिकार दिला पाहिजे. तसेच अशा विषयांवर अंतिम निर्णय सर्वसाधारण सभेतच घेण्यात यायला हवा. मात्र कोणतीही प्रक्रिया न पाळता सदस्यत्व रद्द करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला, असा आरोप त्यांनी केला.

**''सक्रिय दुकान नसल्याने पवार सभासदच नाहीत''**

संघटनेच्या घटनेनुसार सभासद होण्यासाठी संबंधित व्यक्तीच्या नावाने परवानाधारक आणि कार्यरत औषध दुकान असणे आवश्यक असल्याचे तोतला यांनी सांगितले. साईनाथ पवार यांचे नाव जालना येथील चंदनझिरा भागातील ''आदेश मेडिकल'' या दुकानाशी जोडलेले आहे. परंतु हे दुकान गेल्या दोन वर्षांपासून बंद असून त्या ठिकाणी मालकाने बिल्डरचे कार्यालय सुरू केल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे घटनेनुसार पवार हे सभासद ठरत नसल्याचेही तोतला यांनी स्पष्ट केले.

**भ्रष्टाचार झाकण्यासाठी कारवाईचा आरोप**

स्वतःचा भ्रष्टाचार लपविण्यासाठीच हा सर्व खटाटोप सुरू असल्याचा आरोपही तोतला यांनी केला. गेल्या १३ वर्षांपासून संघटनेचा एकदाही सर्वसाधारण सभेत हिशोब सादर करण्यात आला नाही. लाखो रुपयांचा व्यवहार झाला असतानाही कोणतेही आर्थिक विवरण सदस्यांसमोर ठेवण्यात आले नाही, असा आरोप त्यांनी केला.

त्याचबरोबर दर तीन वर्षांनी निवडणूक घेणे बंधनकारक असताना गेल्या दहा वर्षांत निवडणूक न घेता पदाला चिकटून राहिल्याचा आरोपही त्यांनी केला. संघटनेचा हॉल मुलाच्या नावावर कमी भाड्याने देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप करत, सदस्यांना माहिती मिळाल्यानंतर हा करार रद्द करावा लागल्याचेही त्यांनी सांगितले.

**''संघटनेच्या हक्कासाठी लढलो''**

संघटनेतील अनागोंदी कारभाराबाबत आम्ही सुमारे ५० पत्रे देऊन राज्य संघटनेकडेही दाद मागितली, परंतु कुठेही प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर उपोषणही करण्यात आले. सभासदांच्या हक्कासाठी लढणे हा गुन्हा असेल तर तो आम्हाला मान्य आहे, असेही तोतला यांनी स्पष्ट केले.

**पवारांना पदमुक्त करण्याची मागणी**

दरम्यान, या प्रकरणी प्रमोद तोतला यांनी संघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे आणि सचिव




अनिल नावंदर यांना निवेदन देत साईनाथ पवार यांना तात्काळ पदमुक्त करण्याची मागणी केली आहे. सध्या पवार कोणत्याही औषध दुकानात मालक किंवा भागीदार नसल्यामुळे त्यांचे सभासदत्वही ग्राह्य धरता येत नाही, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच पवार यांनी या काळात केलेले सर्व निर्णय अवैध घोषित करावेत आणि जिल्हा संघटनेचे कामकाज निवडणुकीपर्यंत उपाध्यक्षांकडे सोपवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर प्रमोद तोतला आणि संजय बोबडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

जिल्हा औषध विक्रेता संघटनेतील या वादामुळे आगामी काळात संघटनेच्या निवडणुकीत मोठी चुरस पाहायला मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

झाडे लावा
झाडे जगवा

युवा आदर्श

## आडमुठी ...

तक्रार सूचना पेटी
असे भली अडमूठी
निर्माण करे विवाद
आवळू लागे मुठी
गंजून गेलेले कुलूप
पेटीला मारते मिठी
सापडत नाही चावी
पंचायत होते मोठी
कधी कधी पेटीमध्ये
कागदांची दाटीवाटी
आंत टाकली तक्रार
पेटीतचं संसार थाटी
खोलली जाणारपेटी
वरून बसता काठी
नोकरशाह निगरगट्ट
जाणती केवळलाठी
हतबल सारी यंत्रणा
हळूवार मारतेपलटी
गठित केली समिती
तक्रार ठरवती खोटी
तक्रार नाही कुणाची
दाखवा रिकामी पेटी
स्वच्छ करावी मनेही
फिरवून भरार तुरटी
विचारपूर्वक योजली
सोय ही जनते साठी
सक्षम करती पध्दती
जाणीव जागते मोठी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## जालन्यात प्रथमच मुली-महिलांसाठी जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा

### खेलो इंडिया अस्मिता सिटी लीगच्यावतीने २२ मार्चला आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशन, क्रीडा विभाग जालना व जिल्हा शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच मुली व महिलांसाठी भव्य योगासन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा अस्मिता सिटी लीग अंतर्गत येत्या रविवारी (दि. २२ मार्च) शहरातील महेश भवन, येथे होणार असून जिल्ह्यातील सर्व मुली व महिला खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सदर स्पर्धा भारत सरकारच्या खेलो इंडिया उपक्रमाशी संलग्न असून ग्रामीण व शहरी भागातील मुली-महिलांना क्रीडा क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेमध्ये १८ वर्षांखालील मुली तसेच १८ वर्षांवरील मुली व महिलांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले आहेत. स्पर्धेत ट्रॅडिशनल योगासन, कलात्मक एकल आणि कलात्मक दुहेरी असे तीन प्रकार असणार आहेत. १८ वर्षांखालील गटासाठी जन्मतारीख १ जानेवारी २००७ ते ३१ डिसेंबर २०१४ दरम्यान असणे आवश्यक आहे, तर १८ वर्षांवरील गटासाठी १ जानेवारी १९७० ते ३१ डिसेंबर २००६ दरम्यान जन्म असलेल्या खेळाडूंना सहभाग घेता येणार आहे. स्पर्धेसाठी खेळाडूंनी खेलो इंडिया आयडी तयार करून ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. सर्व सहभागी खेळाडूंना प्रमाणपत्र देण्यात येणार असून विजेत्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची पदके व मेरिट सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेच्या दिवशी सकाळी ७ वाजता रिपोर्टिंग ठेवण्यात आले असून सकाळी ७.३० वाजता स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. सहभागी खेळाडूंनी स्वतःची योगा मॅट, पाण्याची बाटली, टॉवेल तसेच योगासाठी योग्य व आरामदायी पोशाख सोबत आणावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशन साईराम निंबेकर, मनिषा पुरी, वैभव आर्य यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाची खरी सुरुवात रासेयोतूनच होते - डॉ. सानप

### जिल्हा नेतृत्व विकास उद्बोधन शिबिराचा समारोप; आदर्श स्वयंसेवकांचा गौरव

**जालना । प्रतिनिधी -** विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाची खरी सुरुवात राष्ट्रीय सेवा योजनेतून होते. या व्यासपीठामुळेच विद्यार्थी समाजाभिमुख होऊन घडतो. ज्या महाविद्यालयांमध्ये अशा प्रकारची शिबिरे होतात, तिथल्या विद्यार्थ्यांना विशेष संधी मिळते. दैनंदिनी आणि शिबिरातील शिस्त यावर विद्यार्थ्यांनी लक्ष दिल्यास त्यांचे भविष्य उज्ज्वल होईल, असे प्रतिपादन राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. गजानन सानप यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने पिरकल्याण (ता. जालना) येथे आयोजित जिल्हा नेतृत्व विकास उद्बोधन शिबिराच्या समारोप प्रसंगी ते




प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांनी शिबिराच्या यशस्वितेबद्दल समाधान व्यक्त केले. या शिबिरामुळे विद्यार्थ्यांची समाजाशी नाळ जोडली गेली आहे. त्यांच्यात एकमेकांसोबत मिळून-मिसळून काम करण्याची वृत्ती निर्माण झाली असून, हेच विद्यार्थी भविष्यात नेतृत्व करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. भारत खंदारे म्हणाले की, श्रमदान आणि विचारांची देवाणघेवाण हेच या शिबिराचे फलित आहे. विद्यार्थ्यांनी मातृऋण, पितृऋण आणि समाजऋण फ ेडण्यासाठी सदैव तत्पर राहिले पाहिजे. समाजसेवा ही केवळ घोषणा नसून ती आपल्या रक्तात भिनली पाहिजे. स्वामी विवेकानंदांचा आदर्श समोर ठेवून विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासावी आणि लोकशाही प्रबळ करण्यासाठी हातभार लावावा. रासयोचे संचालक पान २ वर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्व पक्षीय नागरिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी कपील खरात तर सचिवपदी शरद मांगधरे

**जालना । प्रतिनिधी -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त जालना येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्व पक्षीय नागरिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते कपील खरात यांची तर सचिवपदी शरद मांगधरे यांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान, सह सचिवपदी अमित साळवे तर कार्याध्यक्षपदी राहूल सुरेश रत्नपारखे यांची निवड करण्यात आली आहे.

रविवारी ( दि. १५) सामाजिक न्याय भवनात आयोजित बैठकीत ही निवड करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक नेते सुधाकरराव रत्नपारखे हे होते. या बैठकीत मावळते अध्यक्ष प्रदीप रत्नपारखे यांनी गतवर्षीच्या जयंती उत्सव समितीच्या कार्याचा अहवाल सादर केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या सर्व पक्षीय नागरिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते कपील खरात तसेच सचिवपदी शरद मांगधरे तर सह सचिवपदी अमित साळवे यांची या बैठकीत बिनविरोध निवड करण्यात आली. कार्याध्यक्षपदी राहूल सुरेश रत्नपारखे यांची निवड करण्यात आली. यंदाची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी सर्व पक्षीय जयंती विविध उपक्रमाचे आयोजन करून उत्साहात साजरी करण्यात येणार असल्याचे नूतन अध्यक्ष कपील खरात यांनी जाहीर केले. तत्पूर्वी माजी नगराध्यक्ष पार्वताबाई रत्नपारखे, माजी नगरसेवक गणेशराव रत्नपारखे, सामाजिक नेते प्रमोद रत्नपारखे यांना श्रद्धांजली अर्पण करतात आली.

या बैठकीस ज्येष्ठ सामाजिक नेते अॅड. बी. एम. साळवे, अॅड. ब्रम्हानंद चव्हाण, पान २ वर



## संपादकीय पान

# इराण युद्ध अमेरिकेला जड जातंय

इराण अमेरिका युद्धाला आता पंधरा दिवस होत आले तरी हे युद्ध थांबायचे नाव घेत नाही. ज्या वेळी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ला करून इराणचे सर्वोच्च नेते आयातूला खामेनी यांची हत्या केली तेंव्हा इराण आणि इस्रायल या देशांनी दावा केला की आम्ही इराणच्या सर्वोच्च नेत्याला संपवून टाकल्याने इराण लवकरच आम्हाला शरण येईल आणि अवघ्या काही तासात किंवा फार फार तर दोन ते तीन दिवसांत हे युद्ध संपेल. जगालाही तसेच वाटले होते कारण अमेरिका आणि इराण यांची तुलनाच होऊ शकत नाही. अमेरिकेची शस्त्र सज्जता पाहिल्यास इराण त्यांच्यापुढे नगण्यच आहे त्यात अमेरिकेला इस्रायलची साथ त्यामुळे हे युद्ध लवकरात लवकर संपवून अमेरिका स्वतःचे मनसुबे पूर्ण करेल असेच सर्वांना वाटले होते पण झाले उलटेच. आयातूला खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराणने अमेरिकेला जशास तसे उत्तर देण्याचे ठरवले. इराणने अमेरिका इस्रायलला त्यांच्याच भाषेत उत्तर देऊन या दोन्ही देशांना जेरीस आणले. इतक्यावरच इराण थांबला नाही तर इराणने ज्या आखाती देशात अमेरिकेचे लष्करी तळ आहेत तिथे हल्ला करुन ते नष्ट केले आणि अमेरिकेला हिसका दाखवला. इराण अमेरिकेचा इतका कडवा प्रतीकार करेल असे कोणालाही वाटले नव्हते खुद्द ट्रम्प यांनाही तसे वाटले नव्हते पण आता त्यांना त्याची जाणीव झाली असावी म्हणूनच ते आता युद्ध थांबवण्याची भाषा करत आहे. हे युद्ध अपेक्षेपेक्षा जास्त लांबले त्यामुळे ट्रम्प यांच्यावर अमेरिकेतूनही टीका होऊ लागली आहे. त्यात इराणने हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्याने या समुद्राधुनीमार्गे जगात होणारा इंधन पुरवठा थांबल्याने अनेक देशांनी रशियाकडून इंधन विकत घेतले. रशियाने चढ्या दरात इंधनविक्री सुरू केली त्यामुळे रशियाच गब्बर होऊ लागली. याचाच अर्थ इराण अमेरिका युद्धाचा खरा लाभार्थी रशिया ठरला. दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ म्हणतात ते यालाच. भारतासह अनेक देशांनी रशियाकडून इंधन खरेदी करू नये यासाठी टेरीफ लावून ब्लॅकमेल करणाऱ्या ट्रम्प यांनाच त्या देशांना रशियाकडून इंधन खरेदी करा असे सांगावे लागले एकप्रकारे ट्रम्प यांचा हा अपमानच आहे. हे युद्ध जितके लांबेल तितकी त्याची जगाला किंमत मोजावी लागेल. या युद्धाचे परिणाम जगातील अनेक देशांवर होऊ लागले आहे. अनेक देशात गॅस आणि इंधन तुटवडा निर्माण झाला आहे. गॅस आणि इंधन तुटवड्यामुळे सर्वसामान्यांच्या जगण्यामरण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. हे युद्ध अमेरिकेने लादले असल्याने जगभर ट्रम्प यांचा निषेध व्यक्त केला जात आहे. खुद्द अमेरिकेतही ट्रम्प यांचा मोठ्या प्रमाणात निषेध व्यक्त व्यक्त होत आहे. ट्रम्प यांच्या निषेधासाठी अमेरिकन नागरिक रस्त्यावर उतरत आहे. एकीकडे ट्रम्प यांचा निषेध केला जात असतानाच दुसरीकडे इराणच्या प्रति जगाची सहानुभूती वाढत चालली आहे. एकूणच हे युद्ध ट्रम्प यांना जड जात असून आता हे युद्ध लवकरात लवकर संपवण्याची त्यांची मानसिकता बनली आहे. अर्थात इराण याला सहजासहजी संमती देईल असे वाटत नाही त्यामुळे ट्रम्प यांनी हे युद्ध लवकर संपेल असे म्हटले असले तरी तसे होईलच असे कोणीही ठामपणे सांगू शकत नाही.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

## पान १ वरुन

### विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व ...

प्रा. सोमीनाथ खाडे यांनी पिरकल्याण गाव पुढील पाच वर्षांसाठी दत्तक घेतल्याची घोषणा केली. ते म्हणाले, येत्या जुलैमध्ये गावात वृक्षारोपण करून प्रत्येक घरी एक झाड दिले जाईल. स्वयंसेवकांनी संकटात मार्ग काढणारा दीप बनून चारित्र्यसंपन्न समाज घडवावा, अशी साद घालून गावात ग्रंथालय सुरू करण्याचा निर्धारही व्यक्त केला. महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. दहिफळे यांनी ग्रंथालयासाठी वैयक्तिकरित्या १०१ पुस्तके देण्याचे आश्वासन दिले ग्रामस्थांमधून जगन्नाथ शिंदे, यांनी अनुभव कथन केले. याप्रसांगी जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. विठ्ठल गाडेकर यांनी शिबिराचा अहवाल सादर केला. शिबिरात सना बेगम हिला उत्कृष्ट स्वयंसेविका तर अंकिता गाडे, तनिष्का कांबळे, शंतनु जोशी, अमोल शिंदे व दांडेकर यांना आदर्श स्वयंसेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्थानिक विद्यार्थी शुभम वाघमारे याच्या मदतीबद्दल त्याचाही सत्कार झाला. माजी प्राचार्य डॉ. मोरे, जगन शिंदे, भागवत शिंदे, माधवराव शिंदे, शाळेचे मुख्याध्यापक नागरे यांच्यासह ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा. डॉ उमेश मुंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. शिवाजी गायके यांनी केले

### संत गजानन ...

कर्मचाऱ्यांची चौकशी सुरू आहे.''

दरम्यान, हॉस्पिटल प्रशासनाकडून घटनेबाबत स्पष्ट माहिती देण्यात न आल्याने कुटुंबीयांनी घातपाताची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे हा मृत्यू अपघाती, आत्महत्या की घातपात, याबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे. या संशयास्पद मृत्यूमुळे जालना शहरात भीती आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. पोलीस तपासानंतरच या धक्कादायक घटनेमागील नेमके सत्य समोर येणार आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर ...

सुभाष गाडगे, अशोक साबळे, ॲड. कल्पना त्रिभुवन, सुधाकर रतनराव रत्नपारखे, अकबर इनामदार, सुनील साळवे, पप्पू चत्रे, हरीश रत्नपारखे,जीवन खंडागळे, अशोक रगडे,सचिन कांबळे, महेंद्र रत्नपारखे, भास्कर रत्नपारखे, सतीश वाहुळे,ॲड.योगेश गाडगे,राहूल रत्नपारखे, विलास रत्नपारखे, महेंद्र बी. रत्नपारखे,गौतम वाघमारे, योगेश रत्नपारखे, प्रविण रत्नपारखे, रणजित रत्नपारखे, अनिल रत्नपारखे, मनोज शर्मा, सुनील रत्नपारखे, विलास लहाने, संतोष खरात, भास्कर बोर्डे, कपील किसन खरात, जितेंद्र उघडे, विनोद खरात,प्रमोद मोकळे, अमित कांबळे, निलेश भारद्वाज, निरंत पट्टेबहाद्दूर, सुरज भालेराव यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाडेकरू ठेवलेली मालमत्ता पाडली तरी भाडेकरार संपुष्टात येत नाही

## मुंबई उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

भाडेकरू ठेवलेली मालमत्ता पाडल्यास भाडेकरार संपुष्टात येत नाही आणि घरमालकाची प्रामाणिक गरजही संपत नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. या निकालामुळे घरमालक आणि भाडेकरू यांच्यातील संबंधांवर दूरगामी परिणाम होणार आहेत, असे मत नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी व्यक्त केले आहे. महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायदा, १९९९ अंतर्गत न्यायमूर्ती एम. एम. साठये यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. जमिनीवर उभ्या असलेल्या इमारतीमधील जागेसाठी भाडेकरार केला जातो, तेव्हा जमीन आणि इमारत दोन्ही भाड्याच्या मालमत्तेचा भाग असतात. त्यामुळे केवळ इमारत पाडल्याने भाडेकरार संपुष्टात येत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

या प्रकरणात, घरमालकाने महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायद्याच्या कलम १६(१)(ग) नुसार प्रामाणिक गरजेसाठी आणि कलम १६(१)(एन) नुसार मालमत्तेचा वापर होत नसल्याच्या कारणास्तव भाडेकरूला बाहेर काढण्यासाठी दावा दाखल केला होता. खटला प्रलंबित असताना, महानगरपालिकेच्या सूचनेनुसार धोकादायक झाल्यामुळे इमारत पाडण्यात आली. ट्रायल कोर्टाने घरमालकाच्या बाजूने निकाल दिला होता, परंतु अपिलीय न्यायालयाने इमारत पाडल्यामुळे घरमालकाची प्रामाणिक गरज उरली नाही, असे सांगत ट्रायल कोर्टाचा निर्णय रद्द केला होता. या निर्णयाला घरमालकाने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

उच्च न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्ट केले की, जेव्हा जमिनीवरील इमारतीसाठी भाडेकरार केला जातो, तेव्हा जमीन आणि इमारत दोन्ही त्या कराराचा अविभाज्य भाग असतात. केवळ इमारत नष्ट झाल्याने भाडेकरार संपुष्टात येत नाही, जोपर्यंत जमीन अस्तित्वात आहे. न्यायालयाने पुढे म्हटले की, ''एकदा जमिनीवर उभ्या असलेल्या इमारतीच्या जागेसाठी भाडेकरार झाला की, इमारत आणि जमीन दोन्ही भाड्याच्या मालमत्तेचे घटक बनतात आणि केवळ इमारत पाडल्याने भाडेकरार संपुष्टात येत नाही.''

प्रामाणिक गरजेच्या मुद्द्यावर न्यायालयाने नमूद केले की, ही गरज दावा दाखल करण्याच्या तारखेला तपासली पाहिजे. नंतरच्या घटनांचा विचार तेव्हाच केला जाऊ शकतो, जेव्हा त्या गरजेला पूर्णपणे नाहीसे करतात. इमारत पाडल्याने घरमालकाची गरज आपोआप संपुष्टात येत नाही, असे न्यायालयाने म्हटले. ''इमारत पाडली असली तरी भाडेकरूचा हक्क कायम राहतो आणि दावा दाखल करताना असलेली गरज विचारात घ्यावी लागेल. दावा दाखल करण्याच्या दिवशी इमारत अस्तित्वात होती, त्यामुळे घरमालकाची गरज नाकारता येणार नाही,'' असे न्यायालयाने स्पष्ट केले.

ॲड. धन्नावत यांनी सांगितले की, अपिलीय न्यायालयाने पुराव्यांचा आणि युक्तिवादाचा चुकीचा अर्थ लावला, ज्यामुळे न्यायाचा विपर्यास झाला, असे उच्च न्यायालयाचे मत झाले. त्यामुळे, उच्च न्यायालयाने आपल्या पुनरीक्षण अधिकाराचा वापर करून अपिलीय न्यायालयाचा निर्णय रद्द केला आणि ट्रायल कोर्टाचा घरमालकाच्या बाजूने दिलेला निकाल कायम ठेवला. या निकालाने घरमालकांना मोठा दिलासा मिळाला आहे, जे अनेक वर्षांपासून आपल्या मालमत्तेचा ताबा मिळवण्यासाठी कायदेशीर लढाई लढत आहेत.

अजितनाथ तात्यासाहेब शेटटी आणि इतर विरुद्ध मेसर्स गोविंदराम शोभाराम ॲंड कंपनी या खटल्यात सिव्हिल रिव्हिजन अर्ज क्रमांक ४, २०२५ हा निर्णय देण्यात आला. या निकालामुळे भाडे नियंत्रण कायद्यातील तरतुदींचा अर्थ लावताना भविष्यात न्यायालयांना एक महत्त्वाचा आधार मिळेल, असेही ॲड. धन्नावत यांनी नमूद केले.

# भारतभर गॅस पुरवठा विस्कळीत !

भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत असताना ऊर्जा संसाधनांची मागणीही सातत्याने वाढत आहे. नैसर्गिक वायू हा तुलनेने स्वच्छ आणि कार्यक्षम ऊर्जा स्रोत मानला जात असल्यामुळे घरगुती वापर, उद्योग, वीज निर्मिती, खत उत्पादन आणि वाहतूक क्षेत्रात त्याचा वापर वाढत आहे. भारत सरकारने २०३० पर्यंत देशाच्या ऊर्जा वापरामध्ये नैसर्गिक वायूचा वाटा सुमारे ६ टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. तथापि, अलीकडील काळात भारतात गॅस पुरवठा विस्कळीत होण्याची समस्या अधूनमधून निर्माण होत असल्याचे दिसून येते. ही समस्या केवळ ऊर्जा क्षेत्रापुरती मर्यादित नसून तिचा परिणाम उद्योग, शेती, वाहतूक आणि सामान्य नागरिकांच्या जीवनावरही होतो.

भारताची एकूण नैसर्गिक वायूची मागणी सुमारे १८० ते १९० मिलियन स्टँडर्ड क्यूबिक मीटर प्रति दिवस () इतकी असल्याचे अंदाज आहे. मात्र देशांतर्गत उत्पादन सुमारे ९० ते १०० इतकेच आहे. म्हणजेच देशाच्या गॅस गरजेपैकी जवळपास निम्मी गरज आयातीद्वारे पूर्ण करावी लागते. त्यामुळे भारताची ऊर्जा सुरक्षा मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय बाजारावर अवलंबून आहे. विशेषतः द्रवीकृत नैसर्गिक वायू () आयात करून ही तूट भरून काढली जाते. जेव्हा जागतिक बाजारात पुरवठा साखळीमध्ये अडथळे निर्माण होतात किंवा किंमती वाढतात तेव्हा त्याचा थेट परिणाम भारताच्या गॅस पुरवठ्यावर होतो.

जगातील ऊर्जा वाहतुकीसाठी महत्त्वाचा मार्ग असलेली होर्मुज सामुद्रधुनी या संदर्भात विशेष उल्लेखनीय आहे. जगातील सुमारे ३० टक्के तेल आणि मोठ्या प्रमाणातील या मार्गाने वाहतूक होते. या भागात राजकीय तणाव किंवा संघर्ष निर्माण झाल्यास जागतिक ऊर्जा पुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीचा परिणाम भारतासारख्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशांवर अधिक प्रमाणात होतो. त्याचबरोबर जागतिक बाजारातील किंमतीतील मोठी चढउतारही एक गंभीर समस्या आहे. काही वर्षांपूर्वी ची किंमत सुमारे ५ ते ६ डॉलर प्रति इतकी होती; मात्र जागतिक ऊर्जा संकटाच्या काळात ती ३० ते ४० डॉलर प्रति पर्यंत वाढल्याची उदाहरणे आहेत. किंमती वाढल्यास आयात खर्च वाढतो आणि पुरवठा व्यवस्थेवर ताण निर्माण होतो.

भारतामध्ये गॅसचा वापर विविध क्षेत्रांमध्ये केला जातो. खत उद्योगात एकूण नैसर्गिक वायू वापरापैकी सुमारे ३० ते ३५ टक्के गॅस वापरला जातो. शहर गॅस वितरण प्रणालीमध्ये सुमारे २० टक्के गॅस वापरला जातो, तर वीज निर्मिती क्षेत्रात सुमारे १५ टक्के गॅस वापरला जातो. त्यामुळे गॅस पुरवठा कमी झाल्यास खत उत्पादनावर परिणाम होऊन शेती क्षेत्रावर अप्रत्यक्ष परिणाम होतो. त्याचप्रमाणे गॅसवर चालणाऱ्या वीज प्रकल्पांचे उत्पादन कमी होते आणि ऊर्जा तुटवड्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते.

भारतामध्ये शहर गॅस वितरण व्यवस्थेचा विस्तार झपाट्याने होत आहे. सध्या देशातील सुमारे २८० हून अधिक शहरांमध्ये शहर गॅस वितरण प्रकल्प सुरू आहेत. या शहरांमध्ये घरगुती पाइप गॅस, वाहनांसाठी आणि लघुउद्योगांसाठी गॅसचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. त्यामुळे गॅस पुरवठा विस्कळीत झाल्यास लाखो ग्राहकांवर त्याचा परिणाम होऊ शकतो.

या समस्येचे आणखी एक कारण म्हणजे पायाभूत सुविधांची मर्यादा. भारतात सध्या सुमारे १७,००० किलोमीटरपेक्षा अधिक लांबीचे गॅस पाइपलाइन जाळे आहे. सरकारने ते पुढील काही वर्षांत सुमारे ३४,००० किलोमीटरपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य ठेवले आहे. पाइपलाइन नेटवर्क अधिक व्यापक झाल्यास गॅस वितरण अधिक कार्यक्षम होऊ शकते आणि पुरवठ्यातील अडथळे कमी होऊ शकतात.

गॅस पुरवठा विस्कळीत होण्याच्या समस्येवर उपाय म्हणून भारताने दीर्घकालीन ऊर्जा धोरण राबवणे आवश्यक आहे. देशांतर्गत गॅस उत्पादन वाढवणे, नवीन गॅस क्षेत्रांचा शोध घेणे आणि तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन क्षमता वाढवणे गरजेचे आहे. त्याचबरोबर आयातीसाठी दीर्घकालीन करार करणे, अधिक टर्मिनल्स उभारणे आणि राष्ट्रीय गॅस पाइपलाइन नेटवर्कचा विस्तार करणे आवश्यक आहे. तसेच सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि हरित हायड्रोजन यांसारख्या नूतनीकरणीय ऊर्जा स्रोतांचा वापर वाढविणेही महत्त्वाचे आहे.



एकूणच, गॅस पुरवठा विस्कळीत होण्याची समस्या ही केवळ ऊर्जा व्यवस्थेची समस्या नसून ती देशाच्या औद्योगिक विकास, शेती उत्पादन आणि आर्थिक स्थैर्याशी संबंधित आहे. त्यामुळे ऊर्जा सुरक्षेला प्राधान्य देऊन दीर्घकालीन नियोजन करणे आणि विविध ऊर्जा स्रोतांचा संतुलित वापर करणे ही भारतासाठी अत्यंत आवश्यक बाब आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय दापोली,**
**जिल्हा रत्नागिरी.**

# मोदीजी, ईपीएस ९५ पेन्शनधारक की जिंदगी से मत खेलिए

ईपीएस ९५ पेन्शनधारक पिछले बारा सालोसे अपने हक के न्यूनतम पेन्शन के लिये सरकारकी आवभगत कर रही है. प्रायव्हेट सेक्टरके लाखो कर्मचारी अपनी सॅलरीसे हर माह कि पेन्शनकी भुगतान रिटायर होने तक पुरी सरकारी नियमोसे कर रही है. बढती महंगाई और बुडापेकी ढलती जानेवाली जिंदगी के साथ दवापर होनेवाले खर्च से बेहाल हो राहा है. हायकोर्ट से लेकरं सुप्रीम कोर्ट तक ईपीएस ९५ के कर्मचारी अपनी हक कि लडाई लड रहे है. कोर्ट ने पेन्शनधारकोको बढते महंगाई को मद्दे नजर रखते हुवे उनके हक कि पेन्शन देने का आदेश सरकार को दिया है. एईपीएस ९५ पेन्शन के अध्यक्ष कमांडर श्री अशोक रावत,वीरेंद्रसिंघ राणावत,रमेश बहुगुणा,सुरेश गंगवाल,विनायक तेंडुलकर और अन्य काही मान्यवर सदस्य भाजप खासदार श्रीमती हेमा मालिनी जी साथ दो बार प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदिजीसे मुलकात कि है. प्रधानमंत्रीजीने पेन्शनधारकोकी मांग जायज है हम असे तुरंत लागू करेंगे ऐसा आश्वासन दिया, लेकिन आज छे साल होने के बावजुद अबतक कोइ ठोस कारवाई नहीं हुई.पछहत्तर सालके बुढे प्रधानसेवक मोदीजी जनता के टॅक्स पर एशोआराम कि जिंदगी जी रहे है और बुढे पेन्शनधारक को हक का पेन्शन देनेके बजाय उन्हे दरदर कि ठोकरे देकर उनके जखमपर नमक छेड रहे है. पेन्शनरके बारा लाख करोड के डिपॉझिट पर अस्सी हजार लाख तो ब्याज मिलता है फिर भी मोदी सरकार बुढे पेंशनरोको खून के आसू बहानेको मजबूर करती है. बारा साल मे संबंधित अधिकारी श्रम मंत्री,वित्तमंत्री से २४० से अधिक मिटिंग हो गयी, लेकिन दुखी पेन्शनधारकोको अब तक आश्वासन के अलावा कूछ नहीं मिला. हर दिन तकरीबन २०० पेंशनरोकि मौत हो रही है. सरकार अस्सी करोड गरीब लोगोको हर महिने फोकटकी कि राशन देते है, लेकिन जिन्होने जिंदगीकी चालीस साल तक पेन्शनमे अपनी कमाईका योगदान दिया है उसकी कोई परवाह नही करते. बारा सालोसे इस ढलती उमर के साथ




अपने हक कि पेन्शन के लिये सरकारसे मिन्नते करनी पडती है. यह सरकार के लिये बडी शरम कि बात है. सांसद विधायक चुनके आनेके बाद विधायक काम करे या ना करे उन्हे तगडा पगार,भत्ता के साथ तगडी पेन्शन भी मिलती है. दर्जनोसे ज्यादा सांसद ने हर बार ईपीएस ९५ पेन्शन के बारेमे सरकारसे गुहार लगायीं, मगर सरकारने आश्वासन के नाम पर बुढे पेन्शनधारकोका मजाक उडाया है. अगर सरकारकी पेन्शन देनेकी नियत नही है, बुढे पेन्शनर सरकारका कुछ बाल बाका कर नही सकती तो ७८ लाख पेंशनरोको खतम करो.वैसे भी बुढे पेन्शनर घुट घुट के रोज मर रहें है.

**यशवंत चव्हाण सीबीडी बेलापूर (नवी मुंबई)**
**मो न ९९२०७७६२७७**

# साक्षी भारुका बनली फिजिओथेरपी डॉक्टर

## सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव

**परतूर । प्रतिनिधी -** साक्षी राजकुमार भारुका हिने बी.पी.टी.एच. (फिजिओथेरपी) परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण करून डॉक्टर ही पदवी प्राप्त केली आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल परतूर शहरासह विविध स्तरातून तिचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.



साक्षी ही डॉक्टर व्हावी, अशी संपूर्ण कुटुंबाची दीर्घकाळापासून इच्छा होती. साक्षीनेही अथक परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर कुटुंबाची ही इच्छा पूर्ण केली आहे. साक्षीचे प्राथमिक शिक्षण परतूर येथेच झाले असून शिक्षणात नेहमीच प्रगतीपथावर असलेल्या साक्षीला पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगर येथील एम.जी.एम. संस्थेत प्रवेश मिळाला. त्यानंतर शासकीय कोट्यातून तिला महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ संलग्न ओजस वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाला. येथे कठोर परिश्रम घेत तिने फिजिओथेरपीची पदवी संपादन केली असून आता ती अधिकृतपणे डॉक्टर झाली आहे.

साक्षीला पत्रकारितेचा समृद्ध वारसा लाभला आहे. तिचे आजोबा स्व. श्रीकृष्ण भारुका हे स्वातंत्र्यपूर्व काळापासून पत्रकारितेत सक्रिय होते. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत तिचे वडील राजकुमार भारुका हे देखील ही परंपरा पुढे नेत आहेत. या पार्श्वभूमीवर साक्षी भारुका हिने वैद्यकीय क्षेत्रात यश संपादन करून परतूर शहरासह आपल्या महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे.

तिच्या या यशाबद्दल आमदार डॉ. राहुल पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कृष्णकुमार सिंग, डॉ. निधी शर्मा, डॉ. राम अवतार, डॉ. निधी जयस्वाल, डॉ. अमर दामले, डॉ. डी'सूजा बेनडीन, डॉ. संदेश लोंढे तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रमोद शिंदे, ए. एस. घाडगे, भागवत शिंदे, प्रा. विजय जरहाट, लक्ष्मीकांत लोहिया यांच्यासह परतूर येथील डॉक्टर, व्यापारी, पत्रकार, वकील तसेच राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# महिला सक्षमीकरणासाठी धोरणांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक - राजेश टोपे

## यशवंतराव चव्हाण सेंटर महिला विभागाचा उपक्रम





**जालना । प्रतिनिधी -** यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र जालना आणि अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने ''धोरण कुठंवर आलं गं बाई!'' हे महिला धोरणांचा लेखाजोखा मांडणारे चर्चासत्र रविवार दिनांक १५ मार्च रोजी अंकुशराव टोपे महाविद्यालयात सेंटरचे जिल्हा अध्यक्ष तथा माजी मंत्री राजेशभैय्या टोपे यांच्या अध्यक्षतेखाली, सेंटरचे कार्यक्रम प्रमुख दत्ताजी बाळसराफ उपमुख्यकार्यकारी आधिकारी कोमल कोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण आणि सहकार महर्षी अंकुशराव टोपे यांच्या प्रतिमा पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. आपल्या प्रास्ताविकात जिल्हा केंद्राचे सहसचिव प्रा.रंजित बायस यांनी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कामाची व्याप्ती तर साधना तीपणकाजे यांनी कार्यक्रमाचे स्वरूप व आजचा कार्यक्रम आयोजित करण्यामागची भुमिका स्पष्ट केली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात माजी मंत्री राजेश भैय्या टोपे यांनी सर्वच क्षेत्रांत महिलांनी केलेल्या गौरवास्पद कामगिरीचा उल्लेख करून मुलामुलींच्या प्रमाणात महाराष्ट्रात

जालना जिल्हा बराच मागे असून, हुंडा बळी विषयी चिंता व्यक्त केली. या सोबतचं आपल्या कार्यकाळात शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या सुरक्षिततेसाठी हॉस्टेल सुरू केल्याचे सांगितले.

या प्रसंगी प्रा.डॉ.मंगल मुळे, ॲड.आश्विनी धन्नावत , प्रा.डॉ. रेणुका भावसार यांनी महिला धोरणाची निर्मिती आणि अंमलबजावणी तसेच १९९४ ते २०२४ या ३० वर्षांच्या काळात महाराष्ट्रात राबविल्या गेलेल्या महिला धोरणांमुळे महिलांच्या आयुष्यात काय चांगले बदल झाले, अंमलबजावणी करताना येणाऱ्या प्रत्यक्ष अडचणी आणि उपाय या विषयांवर सांगोपांग चर्चा घडवून आणली. त्यासोबतच महिला कायद्या मुळे महिलांना संपत्तीत वाटा मिळाला . परंतु अद्यापही महिला धोरणाची अंमलबजावणी योग्य त्या प्रमाणात होत नाही ही शोकांतिका असल्याचे म्हटले. महिला विषयक कायद्या बाबत जनजागृती करण्याची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आले.

महिला संघर्षासाठी कधीच घाबरत नाही म्हणून तीला सरस्वती, दुर्गा, लक्ष्मी म्हणतात. असे सांगून महिला धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीच्या समर्थनार्थ आपण सर्वांनी प्रयत्न करावेत असे आवाहन उपस्तिथ वक्ते व सन्माननीय राजेशभैय्या टोपे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समन्वयक मनिषा पाटील , प्रास्ताविक जालना केंद्राचे सहसचिव प्रा.रंजित बायस यांनी केले तर चर्चेच्या समारोप प्रसंगी दत्ता बाळसराफ यांनी महिला धोरण समजून घेण्याकरिता संपूर्ण राज्यभर असे चर्चासत्र आयोजित करून, त्यातील चर्चेचा मसुदा शासन दरबारी देणार असल्याचे नमूद केले, आभार प्रदर्शन प्रा रविकिरण भुतेकर यांनी केले.

या वेळी मा. निलेश राऊत, केंद्राचे सचिव प्रा.रावसाहेब ढवळे, मुंबई केंद्राच्या महिला विभाग प्रमुख साधना तीपणकाजे, डॉ. बळीराम बागल, बाबांसिंग बायस,प्राचार्य प्रा. राहुल भालेकर, प्राचार्य सुनंदा तिडके, प्राचार्य डॉ.दादासाहेब गजहंस, प्रा डॉ सुजाता देवरे, प्रा. प्रभाकर शेळके, जगदीश कुडे, राजेभाऊ मगर यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक भास्कर शिंदे, प्राचार्य एजास शाह , प्रा.डॉ.रविकिरण भुतेकर, निलेश जोशी, प्रा.डॉ. शंकर तिकांडे , दत्तात्रय राऊतवाड , वैशाली फोके यांनी प्रयत्न केले.

माजी मंत्री रावसाहेब दानवे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्रमांक ९ मधील मोफत सर्वरोग निदान शिबिर; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

# जालनाकरांना दररोज पाणी देऊन दानवे यांना वाढदिवसाचे गिफ्ट देणार - माजी आ. गोरंट्याल

**जालना । प्रतिनिधी -** माजी केंद्रीय रेल्वे राज्य मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या वाढदिवसानिमित्त रुक्मिणी प्रतिष्ठान व ओझेस हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने जालना शहरातील प्रभाग क्रमांक ९ मधील नागरिकांसाठी मोफत सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिराचे उद्घाटन माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या हस्ते करण्यात आले, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भास्कर आबा दानवे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महापौर श्रीमती वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, माजी नगरसेवक नंदकिशोर गरदास, लहुजी क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष विनोद आठवे, स्वीकृत नगरसेवक सिद्धिविनायक मुळे ई.ची उपस्थिती होती.

कार्यक्रमात बोलताना माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी सांगितले की, येणाऱ्या काळात जालना शहराला दररोज शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल आणि हाच रावसाहेब पा.दानवे यांना वाढदिवसाची गिफ्ट ठरेल.

येणाऱ्या काळामध्ये जालना शहराला दररोज पाणीपुरवठा करण्याचा आमचा संकल्प असून त्या दिशेने कामाची अमलबजावणी करण्याचे काम हाती घेतले असल्याचे गोरंट्याल म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनीही जालना शहराच्या विकासाचा मुद्दा मांडत सांगितले की, स्वच्छ जालना, सुंदर जालना, प्रगतिशील व विकसित जालना घडविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे आणि येणाऱ्या काळात जालना शहर विकासाच्या दिशेने वेगाने पुढे जाईल.

यावेळी उपमहापौर राजेश राऊत यांनीही जाहीर केले की, भाजप नेते रावसाहेब पा.दानवे यांच्या वाढदिवसानिमित्त जालना शहर महानगरपालिकेतर्फे भव्य 'महास्वच्छता अभियान' राबवून शहर स्वच्छ करण्यासाठी व्यापक मोहीम हाती घेतली जाणार आहे.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना रुक्मिणी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा तथा नगरसेविका संध्या संजय देठे यांनी सांगितले की, आगामी काळात संपूर्ण जालना शहरात अशा प्रकारची मोफत आरोग्य शिबिरे आयोजित करून जास्तीत जास्त नागरिकांना आरोग्यसेवेचा लाभ देण्याचा प्रयत्न केला जाईल.

या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांची तपासणी करण्यात आली. यामध्ये डॉ. सुरज सिंह तौर, डॉ. क्रांती सिंह लाखे पाटील, डॉ. रवी थोरात यांच्यासह वैद्यकीय पथकाने नागरिकांची आरोग्य तपासणी केली.


कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संजय देठे यांनी केले. या प्रसंगी लहुजी क्रांती सेनेचे विनोद आठवे, शेख अनुभाई, श्रीनिवास देशमुख, सुनील भालेराव तसेच मोठ्या संख्येने महिला भगिनी व नागरिक उपस्थित होते.

## शिफारस पत्रासाठी ५० हजारांची मागणी शिक्षणाधिकाऱ्यांवर आरोप

**वाशिम -** एका शिफारस पत्रासाठी ५० हजार लाचेची मागणी केल्याचा आरोप वाशिमच्या शिक्षणाधिकारी मंगल धुपे यांच्यावर करण्यात आला आहे. हा आरोप शिक्षकांनी केला आहे. शिक्षणाधिकारी धुपे, भाजप नेत्या संगीता शिंदे आणि शिक्षकाच्या संवादाची चित्रफीत सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. तुमची कंप्लेंट करते असे भाजप नेत्या संगिता शिंदे यांनी म्हटलं आहे. तर शिक्षणाधिकारी म्हणाल्या करा कंप्लेंट असं म्हटलं आहे. या चित्रफितीमुळे पुन्हा एकदा शिक्षण विभागातील भ्रष्टाचाराचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. शालार्थ आयडीसाठी आवश्यक असणारे शिफारस पत्र माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगल धुपे यांनी अडवून ठेवले आहे. यासाठी हे पत्र देण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच मागितली जात असल्याचा आरोप शिक्षक भारत टोंचर यांनी शिक्षण अधिकारी मंगल धुपे यांच्यावर केला आहे. वाशिमचा माध्यमिक शिक्षण विभाग भ्रष्टाचाराचा कुरण झालं आहे. शिक्षकांच्या शुल्लक कारणासाठी शिक्षणाधिकारी मंगल धुपे पैशाची मागणी करत आहेत. शिक्षण विभागावर भाजप नेत्या संगीता शिंदे यांनी गंभीर आरोप केले आहेत.



# वृक्षतोडीमुळे निसर्गाचा समतोल बिघडला- बाबासाहेब शेळके



**जालना । प्रतिनिधी -** वृक्षतोडीमुळे निसर्गाचा समतोल बिघडला असून त्याचा परिणाम तापमानवाढीवर होत आहे, निसर्गाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने वृक्षलागवड करावी, असे आवाहन शिवछत्रपती वनश्री पुरस्कारप्राप्त बाबासाहेब शेळके यांनी केले.

राष्ट्रसंत हभप एकनाथ महाराज लोमटे यांच्या प्रवचन सोहळ्यात ते बोलत होते. देऊळगावराजा येथे रविवारी ( दि. १५) हा सोहळा पार पडला. यावेळी मार्गदर्शन करताना शेळके म्हणाले की, दुष्काळ व अतिवृष्टी तसेच तापमान वाढण्याचे कारण म्हणजे वृक्षतोड हे आहे.वृक्षतोडीमुळे निसर्गाचा समतोल बिघडतो आहे. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने एक झाड लावून त्यांचा लेकराप्रमाणे सांभाळ करावा. आज भारत स्वतंत्र होऊन ७८ वर्ष झाली आहेत, तरीही लोक आज शौचालयाला उघड्यावर जातात ,मुका प्राणी संडास करण्यापूर्वी पायाने माती जमा करतो त्याच्यामध्ये संडास करतो आणि परत मातीने झाकून टाकतो पण दोन पायाचा प्राणी असलेला माणूस उघड्यावर संडास करतो ही शोकांतिका आहे. प्रत्येकाने आपल्या घरी एक शौचालय बांधायला हवे उघड्यावर न जाता शौचालयाचा वापर करावा, असे आवाहनही शेळके यांनी यावेळी केले.

# जालना जिल्ह्यात ऊसतोड कामगार सर्वेक्षण सुरु

## उसतोड कामगारांचे विविध योजनांव्दारे जीवन सुलभ करण्याचा शासनाचा प्रयत्न

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासन, लोकनेते गोपीनाथ मुंडे उसतोड कामगार कल्याण महामंडळ, पुणे आणि स्मार्ट सर्विसेस प्रा. लि. पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मोबाईल ॲप व्दारे सद्यस्थितीत महाराष्ट्रात जिल्हानिहाय उसतोड कामगार सर्वेक्षण सुरु आहे. प्रत्येक जिल्ह्यात तालुकानिहाय सर्वे क्षकांची नियुक्ती करून त्यांना ओळखपत्र, लॉगीन ई. अत्यावश्यक गोष्टी प्रदान करून सर्वेक्षण सुरु करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये साखर उद्योग हा एक प्रमुख उद्योग असून सद्यस्थितीमध्ये राज्यात कार्यरत सहकार व खाजगी क्षेत्रातील साखर कारखान्यामध्ये उसतोड कामगार काम करतात. बहुतांश उसतोड कामगार हे राज्यातील विविध जिल्ह्यात स्थलांतरित होऊन उसतोडीचे काम करतात. या उसतोड कामगारांचे व पर्यायाने त्यांच्या कुटुंबियांचे जीवन अस्थिर व अत्यंत हलाखीचे असल्यामुळे त्यांचे जीवन सुखकारक करून त्यांचे राहणीमान उंचावून आयुष्य स्थिर व सुरक्षित करण्यासाठी ऊस तोडणी व्यवसायातील उसतोड कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी दिनांक १० सप्टेंबर, २०१९ अन्वये गोपीनाथ मुंढे उसतोड कामगार कल्याण महामंडळ स्थापन करण्यात आले आहे.

राज्यातील ऊसतोड कामगार व त्यांचे कुटुंबियांना गळीत हंगामाच्या कालावधीमध्ये अनेक अडी-अडचणींचा सामना करावा लागत असल्याने ऊसतोड कामगारांना ''गृहोपयोगी वस्तू संच'' वाटप करण्यास दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर गृहोपयोगी वस्तू संच वाटप करण्याबाबत गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये ४ लाख




लाभार्थ्यांना गृहोपयोगी वस्तू संच वाटप करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

गृहोपयोगी संचात ४ ताटे, ८ वाटया, ४ पाण्याचे ग्लास, १ झाकणासहित लहान पातेले, १ झाकणासहित मध्यम पातेले, १ झाकणासहित मोठे पातेले, १ भाताचा मोठा चमचा, १ वरण / भाजीसाठी मोठा चमचा, १ पाण्याचा जग (२ लिटर), १ मसाला डब्बा, १ डब्बा झाकणासह (१४ इंच), १ डब्बा झाकणासह (१६ इंच), १ डब्बा झाकणासह (१८ इंच), १ परात, १ स्टेनलेस स्टील प्रेशर कुकर (५ लिटर), १ कढई (स्टील), १ स्टीलटाकी मोठी झाकणासह वगराळासह असे अंदाजित १0000 रुपये किमतीचे एकूण ३0 नगांचा भांड्याचा संच दिला जाणार आहे.

याव्यतिरिक्त ऊसतोड कामगारांच्या मुलांची शिक्षणाबाबतची आस्था वाढीस लावून त्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग सुकर करण्यासाठी स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी ''संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना'' सुरू करण्यात आलेली आहे. सदर योजनेंतर्गत राज्यातील ऊसतोड कामगारांची संख्या अधिक असलेल्या ४१ तालुक्यांच्या ठिकाणी मुलांसाठी ४१ व मुलींसाठी ४१ अशी एकूण ८२ (प्रत्येकी १00 विद्यार्थी क्षमता असलेले) शासकीय वसतिगृह सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. आणखी महत्वाचे म्हणजे सदरील उसतोड कामगारांना विमा संरक्षण देण्याच्या भूमिकेतून अपघातात मृत्यू झाल्यास रु. 0५ लक्ष, कायमचे अपंगत्व आल्यास रु. २.५ लक्ष, स्वतः च्या मालकीच्या बैलजोडीचा मृत्यू किंवा कायमचे अपंगत्व आल्यास रु. ७५ हजार ते 0१ लक्ष, राहत्या झोपडीचे नुकसान झाल्यास रु. १0 हजार अश्या विविध प्रकारच्या भूमिकेतून आर्थिक संरक्षण देण्याचा शासनाचा मानस आहे. जिल्हा आरोग्य विभागाच्या सहकार्याने कामगारांच्या कामाच्या ठिकाणी आरोग्य शिबिरांचे नियोजन देखील करण्यात येणार आहे.

# नंदापूर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सविता कैलास खरात यांची बिनविरोध निवड

**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या नंदापूर ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी वंचित बहुजन आघाडीच्या सविता कैलास खरात यांची निवड करण्यात आली. मावळते उपसरपंच सौ. राधाताई ऋषीदर कुरधने यांनी आवर्तन पद्धतीनुसार राजीनामा दिल्याने त्यांच्या रिक्त जागी उपसरपंच पदाच्या निवडीसाठी मंगळवारी (दि. १० )रोजी दुपारी ११ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच दत्तु कुरधने यांच्या अध्यक्षतेखाली सदस्यांची बैठक बोलविण्यात आली. यावेळी उपसरपंच पदासाठी सौ. सविता कैलास खरात यांचा निर्धारित वेळेत एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने सौ. खरात यांची दु. २ वाजता सर्वानुमते बिनविरोध निवड घोषित करण्यात आली. त्यांना सूचक म्हणून सौ. पुनम रविंद्र खरात यांनी स्वाक्षरी केली .

यावेळी सरपंच दत्तु कुरधने, ग्रामपंचायत सदस्य रामदास खरात, कैलास सोळंके, सौ. पूनम रविंद्र खरात, सौ. राधा ऋषिकेश कुरधने, वचित बहुजन आघाडीचे जिल्हा संघटक राजेंद्र खरात, ताऊबा खरात यांच्यासह नागरिकाची उपस्थिती होती. नवनिर्वाचित उपसरपंच सविता खरात यांनी छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई यांच्या पुर्णाकृती पुतळयाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. फटाक्यांच्या आतषबाजीत




सौ. खरात यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी ग्रामविकास अधिकारी श्री शेरकर यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. नूतन उपसरपंच खरात यांचे प्रभाकर म्हस्के, बंडू खरात, शा. व्य. अध्यक्ष मनोज चांदगुडे, सागरबाई वाकोडे, नंदा खरात, सत्यभामा खरात, बाळू खरात, रविंद्र खरात, योगेश खरात, संगीता मोरे, केसरबाई वानखेडे, वैजंता आचलखांब, कविता चांदगुडे, नामदेव खरात, सुशिला म्हस्के, कौसाबाई काळे, कचरू खरात, ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे .

# विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संदर्भात माध्यमिक शिक्षकांचे प्रशिक्षण संपन्न



**सेलगाव । प्रतिनिधी -** स्थानिक स्तरावर सर्वसमावेशक शिक्षणाची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने दिव्यांग बालकांच्या संदर्भात पंचायत समिती, गट साधन केंद्र,बदनापूर अंतर्गत शिक्षकांचे एक दिवसीय प्रशिक्षण नुकतेच यशस्वीरित्या पार पडले. या प्रशिक्षणामध्ये विविध शाळातील शिक्षकांनी उत्सपूर्त सहभाग नोंदविला. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील अधिव्याख्याता श्रीमती प्रेरणा मोरे यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांची ओळख, त्यांच्या शैक्षणिक गरजा, वर्गातील समावेशक अध्यापन पद्धती तसेच शाळा स्तरावर आवश्यक असणाऱ्या शैक्षणिक सुविधा व शिक्षकांची भूमिका याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच जिल्हा रुग्णालय जालना, येथील क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट डॉ. गजानन खरात यांनी अध्यापन करत असताना दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बाबतीत येणाऱ्या अडचणी, ताण तणाव व्यवस्थापन, विविध शैक्षणिक उपक्रम आणि प्रत्यक्ष कृतींच्या माध्यमातून उपस्थित सर्व शिक्षकांना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणासाठी प्रमुख मार्गदर्शक गटशिक्षणाधिकारी डी. एन. क्षीरसागर सर, श्री. नारायण कुमावत सर (विस्तार अधिकारी), श्री. बाबासाहेब जुम्बड इत्यादी मान्यवर उपस्थित होते. प्रशिक्षणाचे नियोजन विशेषतज्ञ श्रीमती. विरांगना इंगोले , विशेष शिक्षक श्री. तुकाराम गिरशेट्टी तसेच श्री ज्ञानेश्वर उचलवाड , साधनव्यक्ती श्री. बालाजी मदन , श्री. परमेश्वर कठोरे , यांनी केले.

## चंदनझिरा पोलिसांची मोठी कारवाई

# घाणेवाडी पाईपलाईनवरील चोरीला गेलेले २० फुटी लोखंडी गडर हस्तगत



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील पाणीपुरवठा करणाऱ्या महत्त्वाच्या वाहिनीवरील लोखंडी साहित्याचा तपासात चंदनझिरा पोलिसांना यश आले आहे. घाणेवाडी ते जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत येणाऱ्या पाईपलाईनवरील कन्हैया नगर नाल्या जवळील चोरीला गेलेले २० फूट लांबीचे लोखंडी गडर पोलिसांनी शोधून काढले असून ते पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले आहे.

नेमकी घटना काय?

दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी घाणेवाडी जलवाहिनीवरील कन्हैया नगर परिसरातील हे २० फ ुटी लोखंडी गडर अज्ञात चोरट्यांनी लंपास केले होते. सार्वजनिक मालमत्तेची आणि पाणीपुरवठा योजनेतील महत्त्वाच्या साहित्याची चोरी झाल्यामुळे परिसरात खळबळ उडाली होती.

पोलिसांची सतर्कता आणि यश

या प्रकरणाचा तपास करत असताना चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या पथकाने अत्यंत सतर्कता दाखवली. तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे आज, दिनांक १४ मार्च २०२६ रोजी पोलिसांनी सदर चोरीला गेलेले लोखंडी गडर शोधून काढले. हे गडर सध्या चंदनझिरा पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले असून, या चोरीमागे नेमकी कोणती टोळी आहे, याचा सखोल तपास पोलीस करत आहेत.

# शासकीय तंत्रनिकेतन, जालना येथे 'तणाव व्यवस्थापन व करिअर' विषयावर कार्यशाळा

**जालना । प्रतिनिधी -** विद्यार्थ्यांमधील वाढता मानसिक ताण लक्षात घेता शासकीय तंत्रनिकेतन, जालना येथे 'तणाव व्यवस्थापन आणि करिअर समुपदेशन' या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत अथर्व सायकॉलॉजिकल कौन्सेलिंग अँड टेस्टिंग सेंटरचे संस्थापक व क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट डॉ. गजानन खरात यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या सुरुवातीला डॉ. खरात यांनी विद्यार्थ्यांमध्ये वाढत असलेल्या परीक्षेच्या भीतीबाबत आणि मानसिक ताणाच्या कारणांबाबत सविस्तर माहिती दिली. मोबाईलचा अति वापर, चुकीची संगत, बदलती जीवनशैली, शारीरिक आकर्षण आणि भविष्याबाबतची चिंता यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक ताण वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. तणावाच्या काळात मन, भावना आणि शरीरात होणारे बदल ओळखणे हे तणाव कमी करण्याचे पहिले पाऊल असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. खरात यांनी तणावाच्या वेळी शरीरात निर्माण होणाऱ्या 'फाईट, फ्लाईट किंवा फ्रीज' या नैसर्गिक प्रतिसादांबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाचा ताण, सबमिशनची घाई आणि करिअरची चिंता ही तणावाची प्रमुख कारणे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**तणाव कमी करण्यासाठी प्रभावी उपाय**

तणावावर नियंत्रण मिळवण्यासाठी त्यांनी काही सोप्या व प्रभावी तंत्रांची माहिती दिली. '५-४-३-२-१' ग्राउंडिंग तंत्र, दीर्घ श्वसन, नियमित व्यायाम, ध्यानधारणा, विपश्यना, तसेच आवडीच्या छंदांना वेळ देणे यामुळे मानसिक संतुलन राखण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. अभ्यासात एकाग्रता वाढवण्यासाठी 'माइंड मॅपिंग' आणि 'फेनमन टेक्निक' या आधुनिक अभ्यास पद्धतींचा अवलंब करण्याचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. वेळेचे योग्य नियोजन करण्यासाठी कामांचा प्राधान्यक्रम ठरवणारी ' रँक ऑर्डर' पद्धत उपयुक्त ठरते, असेही त्यांनी सांगितले.

शारीरिक आरोग्याची काळजी घेणे तणाव नियंत्रणासाठी महत्त्वाचे असल्याचे सांगत




त्यांनी दररोज किमान २० मिनिटे व्यायाम करणे, ७ ते ८ तास पुरेशी झोप घेणे आणि सकस आहार घेणे आवश्यक असल्याचे विद्यार्थ्यांना पटवून दिले. तसेच ताण, चिंता किंवा भीती कमी होत नसेल तर शिक्षक, मित्र, पालक किंवा समुपदेशक यांच्याकडून मार्गदर्शन घेण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

**करिअर संधींबाबत मार्गदर्शन**

करिअर मार्गदर्शन सत्रात डॉ. खरात यांनी पॉलिटेक्निक डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध संधींबाबत माहिती दिली. डिप्लोमा धारक विद्यार्थ्यांना बी.ई. किंवा बी.टेक.च्या द्वितीय वर्षात थेट प्रवेश घेऊन उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच रेल्वे, स्टाफ सिलेक्शन आणि विविध सार्वजनिक उपक्रमांमध्ये सरकारी नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. याशिवाय खाजगी क्षेत्रातील नामांकित कंपन्यांमध्ये प्रॉडक्शन, मेंटेनन्स आणि साईट सुपरवायझर या पदांवरही रोजगाराच्या संधी मिळू शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले. ''केवळ गुणांच्या मागे न धावता आपल्या व्यक्तिमत्त्वाला आणि आवडीला साजेसे करिअर निवडणे अधिक महत्त्वाचे आहे,'' असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. तसेच परीक्षेच्या काळात मेंदू अधिक कार्यक्षम राहण्यासाठी पुरेशी विश्रांती घेणे आणि छंद जोपासणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यशाळेच्या शेवटी विद्यार्थ्यांसोबत रिलॅक्सेशन तंत्राचा सराव करून घेण्यात आला. या मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना मोठा लाभ झाला असून, परीक्षेबद्दलचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाल्याची प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. आर. जावडे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती एस. के. वाघमारे यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख श्री बी. एस. सानप (इलेक्ट्रिकल) होते. यावेळी मंचावर डॉ. गजानन खरात, डॉ. एस. एल. हाके (सिव्हिल), श्रीमती दातार मॅडम, श्रीमती जी. बी. सोनावणे आणि श्रीमती एस. के. वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे नियोजन, आभार प्रदर्शन आणि व्यवस्थापन महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी केले. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना तणाव व्यवस्थापनासोबतच करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन मिळाल्याने उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.